दै सामना ② 23/7

# नांदेड महापालिका निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर ८२ जणांचे आक्षेप

## १० ऑगस्टपर्यंत सुनावणी होऊन निर्णय

नांदेड : महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर हरकती आणि सूचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून, यावर निवडणूक विभाग १० ऑगस्ट २०१७ पर्यंत या आक्षेपावर सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करणार आहेत.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभागरचना तयार झाली असून, प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सूचना नोंदवायच्या असतील त्यांनी ११ ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे, असे सांगितले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागांतून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरुवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चूक झाल्यामुळे ती दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते. प्रत्येक प्रभागात किमान १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटल्यामुळे याचा सर्वांना सारखाच लाभ झाल्याची भावना समोर आली होती.

यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी नगण्य असून, सर्वाधिक आक्षेप प्रभागरचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाल्याचे समोर आले आहे. यामध्ये आक्षेप नोंदविणाऱ्या सर्वात जास्त प्रभागाची तयारी करण्यात आलेली व्याप्ती आणि त्यांची हद्द या संदर्भात अधिक आक्षेप दाखल झाले आहेत. विशेषतः यात माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला यांनी त्यांच्या हद्दीबाबतही आक्षेप नोंदविला आहे. विशेषतः आक्षेप नोंदवता अनेकांनी हद्द ही रस्ता, नाली किंवा ठराविक ठिकाणाहून हद्द तयार करण्यात यावी, असा आक्षेप अनेकांनी नोंदविला असल्याचे समोर आले आहे.

दै लोकमत ③ 23/7

# मनपाच्या प्रभाग रचनेवर ९२ जणांचे आक्षेप

## ▶१० ऑगस्टला होणार सुनावणी, व्याप्तीवर सर्वाधिक आक्षेप

**नांदेडः प्रतिनिधी**

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर हरकती आणि सुचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून यावर निवडणुक विभाग १० ऑगस्टपर्यंत या आक्षेपावर सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करणार आहेत. दरम्यान प्रभागाची व्याप्ती व हद्द यावर आक्षेप दाखल झाले आहेत.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभाग रचना तयार झाली असून प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सुचना नोंदवायच्या असतील त्यांनी दि. ११ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे असे आवाहन केले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागातून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरूवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चुक झाल्यामुळे ती दुरूस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते. प्रत्येक प्रभागात किमान 1 जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटल्यामुळे याचा सर्वांना सारखाच लाभ झाल्याची भावना समोर आली होती. यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी नगन्य असून सर्वाधिक आक्षेप प्रभागरचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाल्याचे समोर आले आहे. विशेषतः यात माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला यांनी त्यांच्या हद्दीबाबतही आक्षेप नोंदविला आहे. विशेषतः आक्षेप नोंदवता अनेकांनी हद्द ही रस्ता, नाली, किंवा ठराविक ठिकाणाहून हद्द तयार करण्यात यावी असा आक्षेप अनेकांनी नोंदविला असल्याचे समोर आले आहे.